I/139304/2024

उपविभागीय अधिकारी,वर्धा यांचे कार्यालय

सिव्हील लाईन, सेवाग्राम रोड, वर्धा

Email- Sdo wardha @ gmail. दुरध्वनी क्र. 07152- 242561

क्रमांक/म.सहा./ प्रस्तु - 1/कावि -172-/2024 दिनांक :- 10.01.2024

प्रमाणपत्र

विषय :- कम्प्लीशन सर्टिफिकेट (Completion Certificate) मिळण्याबाबत

संदर्भ :- 1. अर्जदार साई सहारा लँड डेव्हलपर्स तर्फे भागीदार संजय पुंडलीकराव मानमोडे रा. वर्धा ता. जि. वर्धा यांचे अर्ज
2. या कार्यालयाचे पत्र क्रं./म.सहा./प्रस्तु-1/कावि - 878/ 2023 दिनांक 29.12.2023
3. तलाठी, पवनार ता. जि.वर्धा यांचे दिनांक – 03.01.2024 चा अहवाल

---000---

अर्जदार साई सहारा लँड डेव्हलपर्स तर्फे भागीदार संजय पुंडलीकराव मानमोडे रा. वर्धा ता. जि. वर्धा यांचे मौजा पवनार येथिल स.न. 172/2, 172/3 एकूण आराजी 1.73 हे.आर. या अकृषक अभिन्यासामध्ये विकास कामे पुर्ण केल्याबाबत कम्प्लीशन सर्टिफिकेट (Completion Certificate) मिळण्याबाबत अर्ज सादर केलेला आहे.

या कार्यालयातील मा. क्र. 24/ एन.ए.पी -34/ 2022-23 दि. 26.07.2023 अन्वये मौजा पवनार त. जि. वर्धा येथिल स.न. 172/2, 172/3 एकूण आराजी 1.73 हे.आर. या जमीनीस निवासी वापरा करीता अकृषक परवानगी प्रदान केलेली आहे. सदर जमीन अर्जदार साई सहारा लँड डेव्हलपर्स तर्फे भागीदार संजय पुंडलीकराव मानमोडे यांनी निवासी अकृषक वापराकरीता विकसीत केलेली आहे.

तलाठी, पवनार त. जि.वर्धा यांचे संदर्भिय पत्र क्र. 3 दिनांक 03.01.2024 नुसार मौजा पवनार त. जि. वर्धा येथिल स.न. 172/2, 172/3 एकूण आराजी 1.73 हे.आर. या जमीनी मधिल निवासी अकृषक ले-आऊट मध्ये इलेक्ट्रीक पोल, ओपन स्पेस, पक्के रस्ते, ट्री गार्ड, पक्या नाल्या, पिण्याच्या पाण्याकरीता व्यवस्था ई. विकास कामे झालेले असल्याबाबत मौका चौकशी अहवाल सादर केलेला आहे.

करिता सदर जागेवर मुळमालक/ अर्जदार साई सहारा लँड डेव्हलपर्स तर्फे भागीदार संजय पुंडलीकराव मानमोडे रा. वर्धा ता. जि. वर्धा यांनी मौजा पवनार येथिल स.न. 172/2, 172/3 एकूण आराजी 1.73 हे.आर. या अकृषक ले-आऊट मध्ये विकास कामे केलेली असल्याबाबत तलाठी, पवनार त. जि. वर्धा यांचे अहवालात नमुद केल्यानुसार अर्जदारास कम्प्लीशन सर्टिफिकेट (Completion Certificate) देण्यात येत आहे.

Signed by
Dipak Shivaji Karande
Date: 11-01-2024 13:56:4

(दिपक कारंडे)
उपविभागीय अधिकारी,
वर्धा

Scanned with OKEN Scanner